

**आंदोलन...** मानवी साखळी करुन नागरिकांनी सुखना बचाव आंदोलनाचा एल्गार छेडला.

# सुखना नदीचे दु:ख संपेना

## सुखना बचावचा नारा : इको नीड फाऊंडेशनचे नदीवर आंदोलन

**औरंगाबाद :** नदी म्हणजे मानवी प्रकृतीसाठी जीवनरेखाच मानली जाते, सुखना नदीचे दु:ख अद्याप सरलेले नाही. कारण चिकलठाणा परिसरातूनही कारखान्याचे रसायनयुक्त पाणी या नदीत सोडल्या जात असून, नदीतील पाण्याचा अगदी उग्र वास येत असून नदीकाठचे शेतकरी आजही यातना भोगत आहेत.

बारा महिने वाहणाऱ्या सुखनात विष कालवल्याचे काम गेल्या ३५ वर्षांपासून अविरत सुरु असून, त्यामुळे सुखना धरणातून चिकलठाणा एमआयडीसीला होणारा पाणीपुरवठा बंद पडला. आता पैठणच्या जायकवाडी जलाशयातूनच नागरिकांना व एमआयडीसीला पाणीपुरवठा केला जात आहे. जलही जीवन है, असे फक्त घोषणापुरतेच मर्यादित ठेवले आहे. केंद्र सरकारच्या वतीने नदी बचाव आंदोलनाचा गवगवा केला गेला; परंतु विषाचे टँकर नदीत ओतले जात आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्याने त्याचे दुष्परिणाम चिकलठाणा, झाल्टा आणि इतर ग्रामस्थांच्या शेतीवर झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

नदीपात्रालगत असलेल्या शेतीची पोत बिघडली असून, कांदे,भाजीपाला उत्पादकांना मोठा फटका बसला आहे.

मार्केटमध्ये चिकलठाणा येथील भाजीपाला म्हटले की, अगदी कमी भाव मिळत असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांची आहे. त्यामुळे इको निड फाऊंडेशनच्या वतीने नागरिकांनी सुखना बचावचा विडा उचलला आहे. आंदोलन तीव्र करण्याची घोषणाही प्रा. प्रियानंद आगळे यांनी केली.

### शेतकऱ्यांचा माल कवडीमोल

सांडपाण्याचे पाझर विहिरीत उतरल्याने भाजीपाल्याचे दर घसरले असून, कांदा पीक तर चिकलठाण्यातून नष्टच झाल्याची शेतकऱ्यांची मोठी खंत आहे.

### 'जलही जीवन' म्हणता येईना

जल हे जीवन आहे. त्याची सृष्टीतील सर्वांनाच गरज आहे. परंतु प्रदूषण वाढल्याने ते कितपत योग्य आहे, ही चिंतनाची बाब ठरली आहे.

### नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया...

- नदीचे पावित्र्य नष्ट करणाऱ्या कारखान्यावर प्रदूषण मंडळाने गुन्हा दाखल करावेत, अशी मागणी कारभारी जाधव, माजी नगरसेवक संजय चौधरी, भारत गाजरे, सारंगधर सोत्रे, गणेश कव्हळे, साईनाथ रिठे, जनार्दन कोल्हे, शेख शफीक, भाऊसाहेब म्हस्के, आत्माराम शिंदे, निलेश जाधव, शिवाजी वाघमारे, एकनाथ गाडेकर, गणेश रिठे, गोवर्धन कदम आदी नागरिकांनी केली आहे.